शासकीय दूध योजनेमार्फत संकलित होणाऱ्या दूध खरेदीचे सुधारीत दर निश्चित करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एमएलके २०१३ /प्र.क्र. ९८/ पदुम ८**

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२

तारीख: १९ जून, २०१७

**वाचा :**

१) शासन निर्णय क्रमांक : कृषि व पदुम विभाग, क्रमांक एमएलके २०१३/प्र.क्र.९८/पदुम ८, दिनांक २५.११.२०१४

२) शासन निर्णय क्रमांक : कृषि व पदुम विभाग, क्रमांक एमएलके २०१३/प्र.क्र.९८/पदुम ८, दिनांक १५.१०.२०१६

३) शासन निर्णय क्रमांक: कृषि व पदुम विभाग, क्रमांक एमएलके २०१३/प्र.क्र.९८/पदुम ८, दिनांक ११.४.२०१७

**प्रस्तावना :**

राज्यातील सद्य:स्थितीतील दूध खरेदी दर, उत्पादन खर्च इ. बाबींचा आढावा घेऊन सुधारीत दर निश्चित करण्याबाबत शासनास शिफारस करण्यासाठी मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानुसार दि.१३.८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली "प्रदत्त समितीची" स्थापना करण्यात आलेली आहे. प्रदत्त समितीची दूध खरेदी/विक्री दरात सुधारणा करण्यासंदर्भात दिनांक १५.६.२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रदत्त समितीने या बैठकीअंती केलेल्या शिफारशी विचारात घेवून, गाय व म्हैस दूध खरेदी दरात सुधारणा करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शासनामार्फत दिनांक ११.४.२०१७ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या गाय / म्हैस दुधाचे खरेदी दर पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत.

**शासकीय दूध योजनेसाठी दूध खरेदी दर -**

१) राज्यातील दूध उत्पादकांकडून ३.५ फॅट व ८.५ एसएनएफ गुणप्रतीच्या गाय दूध खरेदी दरात प्रति लिटर रु.३.०० ने वाढ करण्यात येत असून त्यामुळे दूध खरेदी दर रु.२४.००/- वरुन रु.२७.००/- एवढा करण्यात येत आहे. तसेच ३.६ ते ५.० प्रति पॉईट वाढीव फॅट साठी ३० पैसे इतकी वाढ कायम ठेवण्यात येत आहे.

२) राज्यातील दूध उत्पादकांकडून ६.० फॅट व ९.० एसएनएफ गुणप्रतीच्या म्हैस दूध खरेदी दरात प्रति लिटर रु.३.०० ने वाढ करण्यात येत असून ते रु.३३.००/- वरुन रु.३६.००/- एवढा करण्यात येत आहे. तसेच ६.१ ते ७.५ प्रति पॉईट वाढीव फॅट साठी ३० पैसे वाढ कायम ठेवण्यात येत आहे.

शासकीय दूध योजनेमार्फत बृहन्मुंबई दूध योजना व ग्रामीण योजनांमार्फत विक्री करण्यात येणाऱ्या पिशवीबंद गाय दूध / टोण्ड दूध तसेच म्हैस दूध / फूल क्रिम दूध विक्री दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नसून ते संदर्भ क्र. ३ प्रमाणे कायम राहतील.

तसेच राज्यातील संघ/सहकारी संस्था /बहुराज्यीय संघ/नोंदणीकृत प्रकल्प यांना देण्यात येणाऱ्या वरकड खर्चासाठी देण्यात येणारे कमिशनबाबतचे दर संदर्भ क्र.१ प्रमाणे, दूध विक्री कमिशन व अन्य बाबीसंदर्भातील दरात कोणताही बदल करण्यात येत नसून ते दर संदर्भ क्र.२ प्रमाणे कायम राहतील.

हे आदेश दि. २१.६.२०१७ पासून अंमलात येतील.

हे आदेश प्रदत्त समितीच्या दिनांक १५.६.२०१७ च्या बैठकीत शिफारस विचारात घेवून निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०६१९१६५८४४७३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Shaligram Govil

Digitally signed by Rajesh Shaligram Govil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c549410b2251df8c92783a2da17afcacbe7f8fe3a4fd88f156fea84433871f11, cn=Rajesh Shaligram Govil
Date: 2017.06.19 16:58:41 +05'30'

**( राजेश गोविल )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा.(सर्व) मंत्री / राज्यमंत्री/विरोधी पक्ष नेता यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक
३) अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव (सहकार), मंत्रालय, मुंबई
५) आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
६) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) सर्व विभागीय आयुक्त